माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०५
जावक क्र. :-१६०४ दिनांक :- १६/१२/१७

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.१५.१२.१७

१. अपिलकर्ता श्री विजय संतोष जगताप,
राहणार :- प्लॉट नं. ७०० रमाबाई आंबेडकर हौ. सोसा.
पद्मावती, पुणे ४११००९

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

श्री विजय संतोष जगताप
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.

---

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

अपिलकर्ता श्री विजय संतोष जगताप यांनी दिनांक ११/११/२०१७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका यांचेकडे कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडील मयत सेविका उषा संतोष जगताप यांची माहिती मिळणेबाबत अर्ज केला होता.

जनमाहिती अधिकार तथा उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका यांनी अपिलकर्ता यांस उपरोक्त बाबतची माहिती वैयक्तिक स्वरुपाची असून लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक नाही. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र - संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र. ४७९/सहा.मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि. १७ ऑक्टोबर २०१४ अन्वये वैयक्तिक तपशील संबंधातील माहिती देण्याचे बंधन नाही. त्यामुळे सदरची माहिती आपणांस कळविणे अडचणीचे आहे, असे पत्र जा.क्र ११३८/२०१७ दि.२०.११.१७ अन्वये कळविले असल्याचे सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ११/११/२०१७ | १०/१२/२०१७ | २०/११/२०१७ | निरंक | निरंक |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे – माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| १९/१२/२०१७ | ०६/१२/२०१७ | होय | – | ८/१२/२०१७ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. १५/१२/२०१७ रोजी सकाळी १२.०० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | उषा जगताप सफाई सेविका यांचे जीपीएफ नंबर, विमा पॉलीसी नंबर, नाव बदल केल्याचे कगदपत्रे, सन २०१६-२०१७ चे वेतन चिठ्ठी मिळणेबाबत. | उपरोक्त बाबतची माहिती वैयक्तिक स्वरुपाची असून लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक नाही. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र – संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा.मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ दि. १७ ऑक्टोबर २०१४ अन्वये वैयक्तिक तपशील संबंधातील माहिती देण्याचे बंधन नाही. त्यामुळे सदरची माहिती आपणांस कळविणे अडचणीचे आहे, असे पत्र जा.क्र ११३८/२०१७ दि.२०.११.१७ अन्वये कळविले असल्याचे सांगितले. |

## विवेचन

अपिलकर्ता श्री विजय संतोष जगताप, यांचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिनांक ११.११.२०१७ रोजी अर्ज कार्यालयाकडे दाखल झाला. अपिलार्थी यांना त्यांच्या अर्जाचे उत्तर जा.क्र.११३८/२०१७ दि. २०/११/२०१७ रोजी देण्यात आले होते. तरी संबधित जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती कळविणे अडचणीचे आहे असे पत्र पाठविले असे अपिलकर्ता यांनी अपिल अर्जात उल्लेख केला आहे

दिनांक १५/१२/२०१७ रोजी च्या अपिल सुनावणीकरीता उपस्थित राहणेबाबत पत्र जा.क्र.१४०८/२०१७ दि.०८/१२/२०१७ अन्वये कळविण्यात आले.

## -: आदेश :-

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तराची कारणे योग्य असलेने सदर अर्जाचे उत्तर कायम करणेत येत आहे.

प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

(नितीन उदास)
अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त,
कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

दिनांक आणि ठिकाण: १५/१२/२०१७,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-१. अपिलकर्ता श्री विजय संतोष जगताप,
राहणार :- प्लॉट नं. ७०० रमाबाई आंबेडकर हौ. सोसा.
पद्मावती, पुणे ४११००९

२. श्री अशोक महाजन,
जन माहिती अधिकारी तथा,
उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी.......